# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर

**<u>अपिल क्र.७ /२०११</u>**

सुनावणी दिनांक ०८/०६/२०११ व ०९/०६/२०११

श्री जि.वी.राजपुत,
मु.कोबापुर, पो.कनकोर,
ता.गंगापुर, जिल्हा: औरंगाबाद ... अपिल करणार

विरुध्द

माहिती अधिकारी,

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्पतरु पॉईंट, सिनेप्लॅनेटसमोर,
सायन सर्कलजवळ, रोड नं.८, सायन,
मुंबई-४०० ०२२ ... प्रतिवादी

## आदेश

प्रत मिळाली
[illegible]
८/६/११

प्रथम अपिल करणार यांनी दिनांक ०८/०३/२०११ च्या मूळ अर्जामध्ये मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे सादरचे अपिल केलेले आढळते. सदरहू अपिल हे दिनांक १३/०४/२०११ रोजी प्राप्त झाले. सदरहू अपिल प्राप्त झाल्यानंतर, माहिती अधिकारी यांनी दिनांक २१/०४/२०११ रोजी वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्याकडून सदरहू माहिती

मागितली. मात्र त्यापूर्वी दिनांक १३/०४/२०११ रोजी वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी सदरहू अर्जातील मुददा क्रमांक अ बाबतची माहिती, माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविली होती व इतर मुददयांबाबत माहिती देण्यास वेळ लागणार असल्याचे स्पष्ट केले होते. सदरहू माहिती दिनांक २०/०४/२०११ च्या पत्राद्वारे माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिल करणा-याकडे पाठविली होती. ती माहिती दिनांक २१/०४/२०११ रोजी हातोहात मिळाली. मात्र सदरहू माहिती विहित वेळेत न मिळाल्यामुळे अपिल करणार यांनी हे अपिल दाखल केलेले आहे. तसेच त्यानंतर मिळालेली माहिती अपुरी असल्याबाबत दिनांक ३०/०४/२०११ रोजी वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी/सहायक माहिती अधिकारी यांना पत्राने कळविले आहे.

दरम्यानच्या काळात अपिलाची सुनावणी दिनांक १८/०५/२०११ रोजी ठेवण्यात आली होती, परंतु अपिल करणार यांना वैयक्तिक कारणास्तव सुनावणीच्या दिवशी हजर राहण्यास जमणार नव्हते व तसे त्यांनी, त्यांच्या दिनांक १७/०५/२०११ च्या पत्राद्वारे प्रथम अपिलीय अधिकारी यांना ई-मेलद्वारे कळविले होते, त्यामुळे सदरची सुनावणी दिनांक ०८/०६/२०११ रोजी ठेवण्यात आली होती.

त्यानंतर दिनांक ०८/०६/२०११ च्या पत्राद्वारे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी यांच्याकडे उर्वरित माहिती सुनावणीच्या दिवशी पाठविलेली आहे. सदरहू माहिती अपिल करणार यांना सुनावणीच्या दरम्यान देण्यात आलेली आहे. त्याबाबत मुददेनिहाय खालीलप्रमाणे चर्चा झाली.

१. अपिल करणार यांनी मूळ अर्जामध्ये मुददा क्रमांक ४ बाबत दिनांक २४/०५/२००४ रोजी कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी या पदासाठी घेण्यात आलेल्या कनिष्ठ वैज्ञानिक सहायक या पदावर नियुक्त केलेल्या २ उमेदवारांना शासनाच्या कोणत्या परिपत्रकानुसार नियुक्ती देण्यात आली, त्याबाबतची प्रत अद्याप मिळालेली नसल्याचे सांगण्यात आले. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी सदरहू प्रत सुनावणीच्या दरम्यान उपलब्ध करुन दिली.

तसेच कनिष्ठ वैज्ञानिक सहायक पदासाठी उमेदवाराकडे कमी अनुभव असताना देखील शासनाच्या कोणत्या परिपत्रकानुसार त्यांना सवलत देण्यात आली, निवड समितीला तसे अधिकार असल्यास त्याबाबतची प्रत न मिळाल्याबाबत

अपिल करणार यांनी सांगितले. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी सदरहू प्रत सुनावणीच्या दरम्यान उपलब्ध करुन दिली.

सदरहू माहिती मिळाली असल्याबाबत अपिल करणार यांनी सुनावणीच्या दरम्यान समाधान व्यक्त केले.

२. अपिल करणार यांनी मुददा क्रमांक **ब** (१) बाबत माहिती देण्यात आली नाही, असे स्पष्ट केले. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी सदरहू प्रत सुनावणीच्या दरम्यान उपलब्ध करुन दिली.

मुददा क्रमांक **ब** (२) मध्ये मागण्यात आलेल्या सर्व पदांच्या पदोन्नतीसाठी गठीत करण्यात आलेल्या पदोन्नती समितीच्या इतिवृत्ताबाबत, अपिल करणार यांनी सध्या प्रादेशिक अधिकारी व उप प्रादेशिक अधिकारी या पदांची माहिती देऊन उर्वरित पदांची माहिती अपिल करणार यांना सध्या नको असल्याचे त्यांनी स्पष्ट केले, त्यामुळे ती दयावी याबाबत त्यांनी आग्रह धरला नसल्यामुळे ३० दिवसांत आस्थापनाशाखेच्या विनंतीप्रमाणे जास्त माहिती असल्यामुळे, प्रत्यक्ष अभिलेख्यातून काढून देण्यास संमती दिली. त्याप्रमाणे आस्थापनाशाखेने दिनांक ०९/०६/२०११ रोजी सलग सुनावणीमध्ये सदरहू माहिती उपलब्ध करुन देत असल्याचे स्पष्ट केले. माहिती अधिकारी यांनी सदरहू माहिती अपिल करणार यांना उपलब्ध करुन दिलेली आहे.

मुददा क्रमांक **ब** (३) मधील उप अभियंता आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी या पदांच्या शैक्षणिक 'अर्हता धारण केलेल्या अधिका-यांच्या व कर्मचा-यांच्याबाबत माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. उर्वरित माहिती ३० दिवसांत आस्थापनाशाखेच्या विनंतीप्रमाणे जास्त माहिती असल्यामुळे, प्रत्यक्ष अभिलेख्यातून काढून देण्यास संमती दिली. उप प्रादेशिक अधिकारी या पदाची २०००-२००८ या कालावधीत पदोन्नती व नियुक्ती देण्यात आलेल्या अधिका-यांची माहिती आस्थापनाशाखेने आजच म्हणजेच दिनांक ०९/०६/२०११ रोजी दिली असल्यामुळे, उर्वरित पदांची माहिती सध्या नको असल्यामुळे, अपिल करणार यांनी ती देण्याबाबत आग्रह न धरता, आस्थापनाशाखेने दिनांक ०९/०६/२०११ रोजी सलग सुनावणीमध्ये सदरहू माहिती उपलब्ध करुन देत असल्याचे स्पष्ट केले. माहिती अधिकारी यांनी सदरहू माहिती अपिल करणार यांना उपलब्ध करुन दिलेली आहे व उर्वरित माहिती ३० दिवसांत देण्याबाबत मान्यता दिली.

मुददा क्रमांक ड बाबत, आस्थापनाशाखेने विधी विभागातील तदर्थ पदोन्नती दिलेल्या अधिका-यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली असून, इतर पदांबाबत २०००-२००८ मधील माहिती आज दिनांक ०९/०६/२०११ रोजी काही प्रमाणात उपलब्ध करुन दिली व उर्वरित माहिती ३० दिवसांत देण्याबाबत मान्यता दिली.

मुददा क्रमांक इ बाबत वरील कालावधीमध्ये ज्यांना तदर्थ पदोन्नती दिली, त्यांच्याबाबत उपलब्ध असणारी माहिती (तदर्थ नियुक्ती आणि नियमित नियुक्तीबाबतची माहिती ) आजच 'दिनांक ०९/०६/२०११ रोजी दिली. उर्वरित पदांची माहिती ३० दिवसांच्या आत देण्याबाबत आस्थापनाशाखेने मुदत मागितली आहे, ती देण्यास हरकत नसावी.

मुददा क्रमांक उ बाबत वरील कालावधीमध्ये तदर्थ पदोन्नती व नियमित पदोन्नती व नियुक्ती देण्यात आलेल्या अधिका-यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रती ३० दिवसांच्या आत देण्याबाबत आस्थापनाशाखेने मुदत मागितली आहे, ती देण्यास हरकत नसावी.

अपिल करणार हे जर प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या सदरच्या आदेशाबाबत असमाधानी असतील तर ते राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत विहित मुदतीत द्वितीय अपील सादर करु शकतात.

येणेप्रमाणे आस्थापनाशाखेने बहुतांश माहिती दिलेली असल्यामुळे व उर्वरित माहिती ३० दिवसांच्या आत विस्तृत माहिती असल्यामुळे मुदत मागितल्यामुळे ती देण्यात येत आहे व अपिल निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक ९ जून, २०११ दिवशी मुंबई येथून,

( द. त्रि. देवळे )
प्रथम अपिलीय अधिकारी